# काव्यप्रेमासाठी

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

कविता एक सर्वव्यापी भाषा आहे.

अर्थात : हे ब्रह्मांड कवितेद्वारे स्वतःला सहजपणे अभिव्यक्त करते. या ब्रह्मांडाला क्षणभरासाठीदेखील रोखता येत नाही. त्याच्या स्वभावाची ही मागणी असते की, त्याचा उद्‌भव व्हावा आणि ते विस्तृत व्हावे, त्याचा आणखी थोडा उद्‌भव व्हावा आणि त्याच्याही पुढे त्याचा विस्तार होत राहावा.

या ब्रह्मांडाची एक लयबद्धता आहे. समयाच्या आरंभाबरोबरच याचा नादस्पंद उदयास आला आणि त्या आदिस्पंदाचा अविर्भाव झाल्यानंतर युगानुयुगे तो सतत जाणवतोच आहे; आपण तो ऐकावा असा त्याचा आग्रह आहे.

आणि या नादापासूनच आपल्या ब्रह्मांडात एका आकार-विन्यासाचा, आकृत्यांच्या एका संरचनेचा जन्म होतो—अर्थात त्या अणु-परमाणूंच्या संरचनेचा जन्म होतो ज्यांच्यामुळे सर्व गोष्टींची व्यवस्थित मांडणी झाली आहे. तो आदिस्पंद त्या रूपाकारांद्वारे, विभिन्न आकृतीबंधांद्वारे आणि छोट्याछोट्या क्लिष्ट अशा संरचनांतून अभिव्यक्त होतो ज्यांमुळे ह्या सृष्टीला आकार प्राप्त झाला आहे.

आता मी जे तुम्हाला सांगणार आहे, त्याची प्रस्तावना म्हणून मी हे सर्व म्हणते आहे, आणि मी जे सांगणार आहे ते म्हणजे—वर्ष २०२२साठी श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्‌विषयी [ख्रिस्मस् आणि त्याच्या जवळपास साजरा केल्या जाणाऱ्या पर्वांच्या शुभेच्छांविषयी].

***

मी एक संदर्भ देऊन याची सुरुवात करते. श्रीगुरुमाईंच्या सांगण्यावरून वर्ष २०११मध्ये एस. वाय. डी. ए. फाउंडेशनने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटची पुनःस्थापना केली. आणि मग, वर्ष २०१२पासून जवळपास दर वर्षी आपले हे अहोभाग्य आहे की, आपल्याला श्रीगुरुमाईंचे सीझन्स् ग्रीटिंग्स्‌रूपी प्रसाद प्राप्त होत आहेत.

पर्वांच्या या मोसमादरम्यान सिद्धयोगीजन श्रीगुरुमाईंकडून सीझन्स् ग्रीटिंग्स्‌च्या रूपात स्वतःसाठी एक व्यक्तिगत उपहार प्राप्त करण्याची प्रतीक्षा करतात. मी “व्यक्तिगत” का म्हणते आहे? कारण, जरी

आपल्या सगळ्यांना तेच सीझन्स् ग्रीटिंग्स् प्राप्त होतात, तरीदेखील त्याविषयीचा आपल्यापैकी प्रत्येकाचा अनुभव हा निराळा असतो.

तुमच्यापैकी अनेक लोकांनी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर असे सांगितले आहे की, श्रीगुरुमाईंकडून प्राप्त होणाऱ्या या उपहाराचा तुमच्यासाठी काय अर्थ आहे—तुम्हाला त्याची अनुभूती कशा प्रकारे होते, तुम्ही त्याच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहता. तुम्ही जे लिहून पाठवता ते वाचणे मला नेहमीच खूप आवडते आणि मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे जेव्हा तुम्ही म्हणता की, श्रीगुरुमाईंचे सीझन्स् ग्रीटिंग्स् म्हणजे एक काव्य आहे. ते संगीत आहे. ती कलाकृती आहे. ते पर्वांच्या आगमनाचे सूचक आहे आणि या मोसमाच्या सर्वोत्कृष्ट तत्त्वांचे सार आहे—तो आनंद ज्यामध्ये कोणतीही चिडचिड नाही, ती शांती जिच्यामध्ये कसलीच अस्वस्थता किंवा चिंता नाही, मंद स्वरांची ती कुजबुज जी हळुवारपणे सांगते आहे की, या विश्वात आणखी काही आहे, असे काहीतरी ज्याला एक सोनेरी झालर सुशोभित करते आहे, असे काहीतरी की, जे जादुई आहे.

माझ्या आत्मीय सह-सिद्धयोग्यांनो, तुम्ही वर्णन केले आहे की, श्रीगुरुमाईंचे सीझन्स् ग्रीटिंग्स् “हृदयात प्रवेश करण्यासाठी एक काव्यात्मक यात्रा आहे.” तुम्ही असे सांगितले आहे की, ते ग्रहण करणे म्हणजे “जणू चमचमणाऱ्या गंगाजलात स्नान करणे होय.” तुम्ही म्हटले आहे की, “सिद्धयोगाच्या श्रीगुरूंची कृपा आणि शिकवणी या विश्वासाठी जे करतात त्याला हे ग्रीटिंग्स् दृश्यात्मक रूपात अभिव्यक्त करतात.” आणि तुम्ही हेदेखील सांगितले आहे की, “यातील संगीताचा पहिला स्वर ऐकताच तुम्हाला श्रीगुरुमाईंच्या दर्शनाची अनुभूती झाली.” हे सीझन्स् ग्रीटिंग्स् ग्रहण केल्यावर ज्या अंतर्दृष्टी तुमच्या अंतरी उद्भवल्या त्या तुम्ही सांगितल्या, ज्या शिकवणींचे तुम्हाला स्मरण झाले त्याविषयी तुम्ही लिहिले आणि त्या कवितादेखील लिहून पाठवल्या ज्या तुम्हाला तुमच्या अंतरी स्फुरल्या.
उदाहरणार्थ, वर्ष २०१६साठीच्या श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्चा आपला अनुभव सांगताना एका व्यक्तीने लिहिले :

*प्रेम उद्भवते मौनातून*
*प्रकट होते नानाविध रूपांमध्ये :*
*मखमली निळे सागर,*
*चमचमणारे तारे,*
*झगमगणारा सोनेरी प्रकाश,*
*कुंडलाकार, चौकोन, गोलाकार आकृती*

*अक्षरे, भाषा आणि अर्थ,*
*सर्व व्यक्त करतात हृदयाच्या परिपूर्णतेला.*
*मग*
*प्रेम परत येते प्रशांतीमध्ये,*
*भगवंताच्या मनात व शरीरात.*

मला हे ठाऊक नाही की, तुमच्यापैकी किती लोकांना हे ज्ञात आहे की, श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्च्या डिझाइनची संकल्पना ही स्वतः गुरुमाईंचीच असते आणि त्याची रचना पूर्णतया त्यांच्या निर्देशानुसारच केली जाते. याच्या रचनेमध्ये श्रीगुरुमाईंचे महान परिश्रम निहित असतात, त्या कित्येक तास या कार्यात निमग्न असतात आणि हे सुनिश्चित करतात की, त्यांची संकल्पना अचूकपणे अभिव्यक्त व्हावी.

याहूनही अधिक म्हणजे, श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्च्या प्रत्येक पैलूची रचना तुम्हा दर्शकांना नजरेसमोर ठेवून केली जाते. श्रीगुरुमाईंसाठी तुम्ही *नेहमीच* महत्त्वपूर्ण आहात. तुम्ही स्वतःविषयी कसाही विचार करत असाल, परंतु श्रीगुरुमाई तुमच्याविषयी सर्वोच्च विचारच करतात, त्या तुमच्याकडे आदरभावानेच पाहतात.

माझे हे सद्‌भाग्य आहे की, मी इतक्या वर्षांमध्ये श्रीगुरुमाईंना अनेक वेळा याविषयी सांगताना ऐकले आहे की, जेव्हा त्या सीझन्स् ग्रीटिंग्स्ची रचना करत असतात तेव्हा त्या तुमच्याविषयी, तुमच्या साधनेविषयी आणि तुमच्या परिस्थिती व तुमच्या अनुभवांविषयी विचार करत असतात. मी इथे याची विस्तृतपणे चर्चा करणार नाही, कारण ती वाचायला तुम्हाला कित्येक तास लागतील, त्याऐवजी मी तुम्हाला एक उदाहरण देऊन सांगते, की ज्यामुळे तुम्हाला स्वतःलाच हे ज्ञात होईल.

वर्ष २०२०मध्ये, गुरुमाईंना याची जाणीव होती की, त्या वर्षातील अधिकांश वेळ लोकांनी घरातच घालवला आहे, कारण मीडिआद्वारे अशी माहिती मिळत होती की, अनेक देशांमध्ये लॉकडाउन होते आणि प्रवासावर इतर निर्बंध लावले गेले होते. याबाबतीत श्रीगुरुमाई गंभीर होत्या की, लोकांच्या मनावर याचा काय परिणाम होईल, विशेषतः यामुळे की, लोक एकमेकांना भेटू शकत नव्हते. म्हणून, त्या वर्षीच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्मध्ये त्यांनी, तुम्हा सर्वांना तीर्थयात्रेचा अनुभव प्रदान करण्याचे ठरवले—ही आठ मिनिटांची एक यात्रा होती जिचा मार्ग दोन्ही बाजूंनी वृक्षांनी सुशोभित होता. प्रज्वलित दिव्यांनी सजवलेला तो वळणदार मार्ग भव्य अशा नीलपर्वताच्या शिखराकडे नेत होता आणि मग पर्वताच्या मागून क्षितिजावर सूर्य हळूहळू उदयास येत होता.

गुरुमाईंची अशी इच्छा होती की, त्यांच्या शिक्षण-यात्रांदरम्यान ज्या तीर्थयात्रा त्यांनी केल्या होत्या—जसे की, मेक्सिको, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये त्यांनी ज्या तीर्थयात्रा केल्या होत्या, त्यावेळी त्यांना जो अनुभव आला होता तशाच प्रकारचा अनुभव तुम्हाला हे सीझन्स् ग्रीटिंग्स् पाहून यावा. अशा प्रकारे, भलेही तुम्ही पर्वांच्या त्या समयी भौतिक रूपाने कुठेही यात्रा करू शकत नव्हतात, तरीदेखील तुम्हाला निराश होण्याची आवश्यकता नव्हती. तुम्ही तेव्हादेखील मुक्तपणे श्वास घेऊ शकत होतात आणि याचे स्मरण ठेऊ शकत होतात की, काहीही घडले तरी तुमची दिव्यता अबाधित आहे. श्रीगुरुमाई तुम्हाला हे शिकवत होत्या की, तुम्हाला जरी असे वाटत असेल की, तुमच्या वास्तविक जीवनावर निर्बंध आहेत, तुमचे मन जरी वेगाने इकडेतिकडे धावत असेल आणि तुम्हाला असे वाटत असेल की, पुढे फक्त अंधारच अंधार आहे आणि हीच चिंता तुम्हाला सतावत असेल, तरीदेखील तुम्ही याचे स्मरण ठेऊ शकता की, तुमच्या अंतरीच्या प्रकाशाला कधीही ग्रहण लागणार नाही.

श्रीगुरुमाई त्यांच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्च्या रचनेसाठी *खूप* परिश्रम करतात, त्यामुळे आपण ही जागरूकता ठेवली पाहिजे की, त्यामध्ये आपल्यासाठी बरेच काही असते जे आपण ग्रहण केले पाहिजे, आत्मसात केले पाहिजे, ज्याच्यासमवेत आपण वेळ घालवला पाहिजे. मला नेहमी असे वाटते की, त्यामध्ये आणखी बरेच काही असते जे उघडऱ्या डोळ्यांद्वारे पाहता येणे शक्य नसते. माझा हा अनुभव आहे की, त्याचे वर्णन करणे सोपे नाही, त्याचा सारांश सांगता येत नाही आणि संक्षिप्तपणे त्याविषयी काही सांगता येणेही शक्य नाही.

तथापि, एक गोष्ट मी निश्चितपणे सांगू शकते की, सीझन्स् ग्रीटिंग्स् *सदैव* एका यात्रेला दर्शवते. कधी ती यात्रा स्पष्ट रूपाने चित्रित केलेली असेल, जसे की वर्ष २०२०मध्ये; तर कधी ती अधिक प्रतीमात्मक स्वरूपात असेल ज्यामध्ये गोष्टी स्पष्ट रूपाने अभिव्यक्त न करता त्या केवळ सांकेतिक वा प्रतीकांच्या माध्यमाने दर्शवलेल्या असतील; आणि त्यांना पाहताच त्या रचनेच्या काव्यात्मकतेप्रति प्रशंसेचा भाव मनामध्ये उद्‌भवतो. जे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे ते हे की, तुम्हाला जे कोणते रंग, आकार व संरचना त्यामध्ये दिसतात, जे कोणते शब्द त्यामध्ये प्रकट व विलीन होतात आणि जे संगीत त्याच्या प्रत्येक तत्त्वामध्ये निनादते—हे सर्वच एक *आंतरिक* यात्रा आहे ज्यावर जाण्यासाठी गुरुमाई तुम्हाला मार्गदर्शन करत आहेत. ही तुमची विशेष तीर्थयात्रा आहे—जिची रचना तुमच्या परमप्रिय श्रीगुरूंनी तुमच्याकरिता केली आहे.

बहुधा असे घडते की, जेव्हा सीझन्स् ग्रीटिंग्स्ची रचना होत असते तेव्हा गुरुमाई त्यांच्या कल्पना व विचार त्या प्रतिभावान लोकांसमोर प्रकट करतात जे त्या सीझन्स् ग्रीटिंग्स्ची रचना करण्यासाठी सेवा

अर्पण करत असतात, आणि गुरुमाई त्यांना हेदेखील सांगतात की, त्यात निहित असलेली छायाचित्रे व शिकवणी कशा प्रकारे लोकांच्या साधनेला प्रकाशित करतील. या वर्षी प्रथमच गुरुमाईंनी सांगितले की, त्यांचा एक अनुभव सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर सांगितला जावा.

हा अनुभव म्हणजे श्रीगुरुमाईंच्या प्रज्ञानाची केवळ शब्दांमध्ये केलेली अभिव्यक्ती नाही, तर त्याचे प्रयोजन हे आहे की, त्यापासून तुम्हाला प्रेरणा मिळावी. गुरुमाईंनी समजावले की, त्यांचे प्रज्ञान ग्रहण करून अनेक लोकांना गहन अनुभूती होतात—तरीदेखील, ते लोक आपल्या त्या अनुभूतींकडे लक्ष देत नाहीत, कारण एकतर त्यांच्याकडे वेळ नसतो किंवा मग त्या क्षणांमध्ये ते जे अनुभवत असतात त्याचे मूल्य ते ओळखू शकत नाहीत. याचा परिणाम असा होतो की, त्या अनुभवांची स्पष्टता व त्यांचा जिवंतपणा लगेच हरवतो; आणि ते अनुभव आठवणे लोकांना कठीण जाते. त्यामुळेच हे महत्त्वाचे आहे की, आपल्याला ज्या शिकवणींचे दर्शन होते आहे, ज्या शिकवणी आपण ग्रहण करत आहोत आणि ज्यांचा आपण अभ्यास करत आहोत—या सर्वांतून आपल्याला येणारे सर्व अनुभव आपण सर्वांनी लिहून ठेवावेत. माझा हा दृढ विश्वास आहे की, श्रीगुरुमाईंची इच्छा आहे की, आपण आपल्या अंतरीच्या खजिन्याचा भरपूर आनंद लुटावा.

श्रीगुरुमाई जेव्हा सीझन्स् ग्रीटिंग्स्‌ची रचना करण्यासाठी सेवाकर्त्यांना निर्देश देत होत्या तेव्हा जे विलक्षण लोक यावर कार्य करत होते त्यापैकी दोन लोक गुरुमाईंना हे दाखवत होते की, त्यांच्या परिकल्पनेला साकार रूप देण्याचे कार्य कुठपर्यंत आले आहे. त्यानंतर गुरुमाई त्यांना म्हणाल्या की, त्या प्रसन्न आहेत, कारण गुरुमाईंच्या शब्दांचे व संकल्पनांचे सार त्यांना पूर्णपणे समजले आहे. गुरुमाई त्यांच्याकडून नेमकी कोणती रचना करवून घेऊ इच्छितात हे त्यांनी समजून घेतले होते. गुरुमाईंनी समजावले की, ही गोष्ट त्या निश्चितपणे सांगू शकतात कारण त्या जेव्हा सीझन्स् ग्रीटिंग्स् पाहत होत्या तेव्हा एका कवितेचे शब्द एखाद्या कारंज्याप्रमाणे त्यांच्या अंतरी स्फुरू लागले जे त्यांच्या श्वासाच्या लयीसमवेत उद्‌भवत होते.

गुरुमाई म्हणाल्या, “असे वाटत होते की, ती जणू काही माझे श्रीगुरू, बाबा मुक्तानंद यांना एक प्रार्थना होती जी माझ्या अंतरातून उदित होत होती जेव्हा मी माझी इच्छा साकार होताना पाहत होते—उत्सवाच्या या मोसमामध्ये जगताला शुभेच्छा देण्याची माझी इच्छा.”

तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर श्रीगुरुमाईंची ही कविता वाचू शकता, जिचे शीर्षक आहे, ‘माझ्या श्रीगुरूंना एक प्रार्थना.’ या कवितेविषयी एक मुख्य गोष्ट आहे जिच्याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छिते, आणि ती आहे : कवितेच्या शेवटी प्रयुक्त लोपचिह्न, म्हणजे ते तीन बिंदू जे जणू काही हळूहळू

आकाशात विलीन होत आहेत आणि त्यामुळे कवितेचे एक निश्चित समापन केले गेलेले नाही. लोपचिह्नाचा प्रयोग निःसंदेह विचारपूर्वक केलेली निवड होती. गुरुमाईंनी सांगितले की, हे या गोष्टीचा संकेत आहे की, ही कविता कशा प्रकारे निरंतर गतिशील होते आहे, ही विकसित होते आहे आणि विस्तार पावते आहे.

गुरुमाई म्हणाल्या, "ही कविता एका धूमकेतूप्रमाणे आहे जो आकाशाच्या घुमटावर या बाजूपासून ते त्या बाजूपर्यंत एका तोरणाप्रमाणे सजला आहे; ही त्या नदीप्रमाणे आहे जी अंतहीन प्रवाहित होत असते. यातील शब्द समस्त भूमंडळावर विखुरल्यानंतरही ते अनंततेमध्ये, चिरंतनतेमध्ये विखुरले जात राहतील. ही आहे गुरुकृपेची शक्ती आणि साधनेप्रति समर्पित असलेल्या जीवनाची शक्ती."

***

तर आता, आपण इथे येऊन पोहोचलो आहोत—एक डिसेंबरला आपण २०२२करिता श्रीगुरुमाईंचे सीझन्स् ग्रीटिंग्स् ग्रहण केले आहेत आणि आता आपण या सीझन्स् ग्रीटिंग्स्चा त्यांचा अनुभव वाचला आहे जो कवितेच्या रूपात आहे आणि ही कविता अनेकानेक रूपांनी अनंत आहे. हे विपुल प्रज्ञान आणि आशीर्वाद प्राप्त झाले असता, मी विचार करते आहे की *तुम्ही* विचार करत असाल : आता, आम्ही काय केले पाहिजे?

मी तुम्हाला काही सुचवू इच्छिते. [आणि हो—ठीक आहे—मी हे मान्य करते की, *कदाचित* मी हे सुचवण्याची तयारी करून आले आहे आणि *कदाचित* मी या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते की, कधी एकदा मी तुम्हाला हे सांगेन. मी काय म्हणावे? तुम्हाला हे सांगण्यासाठी मी *फार* उत्सुक आहे.]

मी असे सुचवू इच्छिते की, तुम्ही आणि मी—आपण सर्व जण—वेळ काढून सीझन्स् ग्रीटिंग्स्च्या विषयावर आपली एक कविता लिहावी.

स्मरणात ठेवा : कविता लिहिण्याच्या बाबतीत जी एक अतिशय छान गोष्ट आहे, ती म्हणजे आपण एखाद्या निश्चित शब्दसंख्येतच कविता लिहिण्यास बाध्य नसतो. आपली कविता एखाद्या थेसिसप्रमाणे असण्याची गरज नाही; ही एखाद्या चार अंकी नाटकाप्रमाणे वा 'इलियाड' अथवा 'महाभारत' यांसारख्या महाकाव्याप्रमाणे असण्याचीदेखील आवश्यकता नाही. यामध्ये मोजकेच शब्द असू शकतात. कविता एका सूत्राप्रमाणे असते. यामध्ये आपल्या अनुभवांचा रस सामावलेला असतो.

अलीकडेच मला एका लहान मुलाने सांगितले की, वर्ष २०२२साठीच्या श्रीगुरुमाईंचे सीझन्स् ग्रीटिंग्स् पाहून त्याची काय प्रतिक्रिया होती. ती एका व्हिडिओच्या रूपात होती जो त्याच्या आईने रेकॉर्ड

केला होता. या व्हिडिओमध्ये तो एक कविता गात होता जी सीझन्स् ग्रीटिंग्स् पाहून त्याच्या अंतरी सहजपणे स्फुरली होती. “तुम्ही माझ्या गुरू आहात, उगवत्या सूर्याप्रमाणे!” तो उल्लसित होऊन हे गात होता. त्याने ही ओळ दुसऱ्यांदा गायली—आणि मग तिसऱ्यांदा गायली—तो आणखी उच्च स्वरात गाऊ लागला, ही ओळ वारंवार गाताना त्याच्या आवाजात त्याची प्रसन्नता, त्याचा हर्ष अधिकाधिकच झळकत होता. “तुम्ही माझ्या गुरू आहात, उगवत्या सूर्याप्रमाणे! तुम्ही माझ्या गुरू आहात, उगवत्या सूर्याप्रमाणे!”

या लहान बालकाला माहीत नव्हते की, श्रीगुरुमाईंनी सीझन्स् ग्रीटिंग्स्‌चा त्यांचा अनुभव एका कवितेच्या रूपात अभिव्यक्त केला आहे आणि त्याला हेदेखील माहीत नव्हते की, आपण सगळेजणसुद्धा कविता लिहिणार आहोत. त्याच्या अंतरी आपसूकच जे उद्‌भवले, ती होती, एक कविता. ती त्याच्या अनुभवाची एक सहज अभिव्यक्ती होती.

तेव्हा आपण असा विचार करू शकतो की, कविता ही आधीपासून आपल्या अंतरी, आपल्यासाठी सुलभ आहेच; ती तिच्या मूळ, विशुद्ध आणि गहन स्वरूपात विद्यमान आहे. कदाचित, आपले काम हेच आहे की, आपण ते शब्द शोधावेत आणि आपली कविता कागदावर उतरवून त्यांचा सन्मान करावा.

आणि मग, आपल्या कविता लिहून झाल्या की, आपण त्यांचे काय करायचे? तुमच्यापैकी काही लोकांनी ओळखलेच असेल की, मी काय सांगणार आहे. होय निश्चितच, आपण त्या एकमेकांना वाचून दाखवू शकतो! असे करण्याचा एक मार्ग हा आहे की, तुम्ही आपल्या कविता सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पाठवाव्यात.

आणि आता, तुम्हाला जर असे वाटत असेल की, तुम्ही एक अति उत्कृष्ट रचना केली आहे—एक आदर्श कविता लिहिली आहे, सर्वोत्तम पद्याची रचना केली आहे—अथवा तुम्ही कसेबसे स्वतःला समजावले असेल की, तुम्ही जे लिहिले आहे ते लहान मुलांच्या नर्सरीतील एखाद्या कवितेपेक्षाही साधेच आहे, तर मी तुम्हाला प्रोत्साहित करते की, तुम्ही ती वेबसाइटवर जरूर पाठवा. मला एक आतली गोष्ट कळली आहे ☺ की, यांपैकी काही कविता विश्वातील सगळ्यांबरोबर शेअर करण्यासाठी निवडल्या जातील. आणि कोण जाणे : त्यामधील एक कविता तुमचीदेखील असेल!

मी आणखी एक गोष्ट सुचवू इच्छिते की, तुम्ही लिहिलेल्या कविता तुम्ही आगामी दिवसांमध्ये व आठवड्यांमध्ये पुन्हा वाचाव्यात. त्यामुळे तुम्हाला सीझन्स् ग्रीटिंग्स्‌चे तुमचे सुरुवातीचे अनुभव आठवण्यास आणि ते विस्तृत करण्यास मदत मिळेल. आणि तुम्हाला जर आणखी कविता लिहाव्याशा

वाटल्या तर होय, नक्कीच, जरूर लिहित राहा! तुमच्या अंतरीच्या कोकिळेला कूजन करू द्या! स्वतःला हा शोध घेण्याची संधी द्या की, जे प्रज्ञान तुमच्या अंतरी विद्यमान आहे ते उद्‌भवून किती अधिक प्रकट होऊ इच्छिते, किती अधिक विस्तृत होऊ इच्छिते—ते आणखी अधिक प्रकट होऊ इच्छिते, आणि त्याच्याही पुढे विस्तृत होऊ इच्छिते.

जसे की श्रीगुरुमाईंनी सर्वांना वारंवार सांगितले आहे : “तुम्ही *महान* आहात.”

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.